International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.4 Mar – Apr 2023

# " माधव सरकुंडे यांच्या कथेतील स्त्री व्यक्तीरेखा चित्रण "

**श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव**
पीएच.डी.संशोधक - पीपल्स कॉलेज नांदेड.
*Corresponding Author* - **श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव**
ईमेल :- chepurwargn27@gmail.com
DOI-10.5281/zenodo.7828087

**'सर्वा' या कथासंग्रहातील स्त्री व्यक्तीरेखा -:**

माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' या कथासंग्रहातील कथांमध्ये ग्रामीण आदिवासी जीवनानुभवांचे चित्रण होत असल्यामुळे त्यातील नायिका किंवा गौण स्त्री व्यक्तीरेखासुध्दा ग्रामीण आदिवासी जीवनाशी निगडितच आहेत .'सर्वा' कथासंग्रहातील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे,

**सटवी -:**

ही स्त्री व्यक्तिरेखा 'सर्वा' कथेतील महत्त्वाची आहे . सटवी ही एक कष्टकरी .ची पत्नी आहेकथेतील नायक खिऱ्या स्वतः काबाडकष्ट करून ती संसार .संसारिक स्त्री आहे . कामाच्या शोधात असतोसटवीचा पती खिऱ्या .चालविते पण त्यास काम मिळत नाही, तेव्हा सटवी संसाराचा भार आपल्या खांद्यावर उचलतेत्याच चिंतेने सटवी भाकरी . कोठं काम बिम फाता की " .वर वसकाळतेबडवत खिऱ्या नाय? मह्या येकटीनं किती वढ कराव ? तुमच्यावं कोठुन काळाची झोप येऊन पडली ? हे असे नवऱ्यावर वस्काळणे ही सटवी च्या व्यक्ती चित्रणाची स्वाभाविकता आहे .

सटवी एक पत्नी व नायिका म्हणून संसारासाठी खिऱ्यावर वस्काळत जरी असली तरीही एक आदर्श पत्नी म्हणून आपल्या नवऱ्याला खिऱ्याला सहकार्य करताना दिसून येतेला पोराच्या शाळेच महत्त्व पटवून तसेच खिऱ्या . व स्वतः पुढाकार घेऊन सटवी शिवरू .देते पाटलांकडे जाते, व पाटलास शेळी विकत घेण्यास सांगतेयावरून आपल्या . पोराच्या शाळे बद्दलची एका आईच्या मनाची काळजी एक आदर्श पत्नी म्हणून जवाबदारी स्वीकारणारी .दिसुन येते स्त्री म्हणून सटवीच स्त्री व्यक्ती चित्र हे 'सर्वा' या कथेत लक्ष्यवेधी आहे .

**लाडू आजी -:**

ही 'लुगडं' या कथेतील मुख्य स्त्री व्यक्तिरेखा आहे . कौटुंबिक व भावस्पर्शी माणुसकी, जिव्हाळा ह्या वृत्तीचे दर्शन घडविणारी लाडू आजी ही व्यक्तिरेखा आहेलाडू . आजीचे विविध भावस्पर्शी प्रसंग'लुगडं' या कथेत येतात . "आसंच राव्हाव माय त्याचा सवसार सुखाचाआमच्या . सांगडेच जगजग मथारे व्हा मन्हा."

वरील विधानावरून लाडू आजीच्या स्वभावातील आपुलकी व स्नेहभाव लक्षात येतोएकुणच लाडू आजीच्या . स्वभाव गुण वैशिष्टयावरून लाडू आजीची मायाळू व कणखर वृत्ती, स्वभावातला जिव्हाळा व माणुसकीचे दर्शन घडते . लाडू आजी ही स्त्री व्यक्तिरेखा लक्ष्यवेधी ठरते.

**'ताडमं' कथासंग्रहातील स्त्री व्यक्तीरेखा -:**

माधव सरकुंडे यांच्या 'ताडमं' या कथासंग्रहातील कथांमध्ये ग्रामीण आदिवासी जीवनानुभवांचे चित्रण होत असल्यामुळे त्यातील नायिका किंवा गौण स्त्री व्यक्तीरेखासुध्दा ग्रामीण आदिवासी जीवनाशी निगडितच आहेत .'ताडमं' कथासंग्रहातील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा पुढीलप्रमाणे आहेत.

**पुंजी -:**

ही स्त्री व्यक्तिरेखा 'माय' कथेतील महत्त्वाची आहे . पुंजी ही एक कष्टकरी .कथेतील नायक गनेशाची आई आहे, संघर्षशील, व काबाडकष्ट करून मुलाला शिक्षण शिकवणारी स्त्री आहे गनेशा मॅट्रिक पास .झाल्यावर शिक्षणासाठी पुंजी शेतात मोलमजुरी करून गनेशाच्या शिक्षणाचा खर्च भागवतेस्वतः निरक्षर असून सुध्दा पुंजीला शिक्षणाचे फार . बाबासाहेब आंबेडकरांच्या गोष्टी .डॉ .मोल असते, भाषणे पुंजी ध्यान देऊन ऐकतेपोटासाठी काबाडकष्ट करून पुंजी . गनेशाच शिक्षण पूर्ण करतेहे अपार काबाडकष्ट करताना . गावातील पाटील .पुंजीला अनेक बरे वाईट अनुभव येतात पुंजीला म्हणतो, "मोऱ्हं काय त्याला शाळतुन काढून टाक." यातुन पाटलांची नकारात्मक प्रवृत्ती, गोर गरिबाविषयींची हिन भावना, जातीय राजकारण दिसून येते .

तरी पण पुंजी न डगमगता गनेशाला काबाडकष्टाने शिकवितेपान तोंडायला जाताना पुंजीवर रानडुकरांचा . हल्ला होतो, त्यातुनही पुंजी बचावतेअसा कठिण संघर्ष .

ए .बी .ए पर्यन्त शिकविते .करीत पुंजी गनेशाला बी या यशात .झाल्यावर अमरावतीला गनेशाला नौकरी लागते जितके अथक परिश्रम गनेशाचे आहेत तितकेच काबाडकष्ट करून गनेशाला शिक्षण शिकायला लावून नौकरी लागण्यापर्यन्त कष्ट, परिश्रम पुंजी ने घेतले असून गनेशाच्या यशाचे खरे श्रेय पुंजीला द्यावे लागेलएक आदर्श माता ., एक संघर्षशील, काबाडकष्ट करणारी स्त्री म्हणुन 'माय' या कथेत 'पुंजी' हे व्यक्तीचित्र महत्वपूर्ण व तितकेच लक्ष्यवेधी आहे.

**गंगा -:**

ही स्त्री व्यक्तिरेखा 'तळ' या कथेतील महत्त्वाची आहेपरिस्थितीने मजबूर झालेली ., शोषित पिडीत - पोटाची खळगी .अन्यायग्रस्त आदिवासी स्त्री आहे .भरण्यासाठी वेश्यावृत्तीकडे गंगा ओढली जाते येनीला 'तळ' निघालं ही बातमी टापुत पसरताच दुर - दुरून लोक तळयावर काम करण्यासाठी येताततिथे चाळीस बाया . माणसांची मोठी गॅंग असतेतिथे गंगेवर ठेकेदार ., अधिकारी जुलूम करतातपरिस्थितीने मजबूर .तिचे शोषण करतात . एकुणच .झालेल्या गंगेलाच लोक उलट नांव ठेवतात समाजातील स्त्रीकडे बोट दाखवून बघण्याची मानसिकता .दिसून येतेतसेच पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचे दुय्यम स्थान कळते .

एकेदिवशी गंगेचा बाप तिला आग लावून पेटविण्याचा प्रयत्न करतोतेव्हा गंगा घरातून पळून जाते ते . ."मह्या धंदा सुरू केला" .कधीच घरी परत येत नाही या विधानावरून परिस्थितीने मजबूर झालेली व घरातील बापालाही नको असलेली गंगा पोटासाठी वेश्यावृत्तीच्या दलदलीत पडते, हे लक्षात येतेगंगा ही अन्यायग्रस्त ., शोषित, पिडित स्त्रीची व्यक्तीरेखा 'तळ' या कथेत लक्ष्यवेधी ठरते.

**राजी -:**

ही 'काटा' या कथेतील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहे . पारी ही रा .कथेतील नायक दासुची पत्नी आहेजी व दासुची मुलगी आहेराजी ही एक आदर्श पत्नी ., संसारिक स्त्री, संसाराचा गाडा प्रसंगी स्वतःच्या खांद्यावर घेणारी कष्टकरी स्त्री व एका मुलीची आदर्श आई आहेराजीचा पती दासु . लाकडाची मोळी विकण्याचे काम करत असतो.

एकेदिवशी दासुला वावरात पायाला काटा मोडतोतो काट .ा काढण्याचा दासु खुप प्रयत्न करतोपण . तेव्हा राजी दासुला वैद्याकडे नेते .काटा काही निघत नाही, पण त्याचा काहीही उपयोग होत नाहीराजी मग दासुला . पुसदच्या सरकारी दवाखान्यात नेते, व डॉक्टरांना विनवणी करते, दासुला वाचवा म्हणते, पण कुणीही लक्ष देत नाही .

"मव्हा नवरा व्हयं साहेब." यावरून एक आदर्श पत्नी म्हणून आपल्या पतीसाठी राजी प्रयत्नाची पराकाष्ठा करतेपुसदहून राजी आपल्या पतीला दासुला यवतमाळ . च्या सरकारी दवाखान्यात नेते, व त्यासाठी राजी हड्डा गहान ठेवतेव यवतमाळहून परत गांवी येताना दासुसाठी . बसस्टॅंडवर भिक मागूनपैसे गोळा करते. एकुणच राजी ही स्त्री व्यक्तिरेखा एक आदर्श पत्नी म्हणून लक्ष्यवेधी ठरते.

**कौतीकी -:**

ही 'करणी' या कथेतील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहे . . मांग याची कौतीकी पत्नी आहेकथेतील नायक फकिऱ्या तर पाटलाच पोरग .देवकी ही कौतीकीची मुलगी आहे, पाटील, बबन्या ह्या कथेतील अन्य दुय्यम व्यक्तीरेखा आढळून येतात .

कौतीकी ही एक आदर्श पत्नी, आदर्श माता व समजुतदार कष्टकरी स्त्री आहे कौतीकीचा पती फकिऱ्या . व संपूर्ण गांवच .मांग हा गावभर करणीसाठी प्रसिद्ध असतो मारतो म्हणून फकिऱ्या बोलत असतोच्या या फकिऱ्या . अहंकारी व वाईट वागणुकीचा त्याची पत्नी कौतीकी नेहमी विरोध करतेला समजावून सांगण्याचा खुप व फकिऱ्या . .प्रयत्न करते "तु कामुन भीतु ये काय करते गांव ?" असे प्रत्युत्तर फकिऱ्या कौतीकीला देतोची ह्यातुन फकिऱ्या . .अहंकारीवृत्ती दिसून येते

तेव्हा कौतीकी चवताळून फकिऱ्यावर पडते . डोळयात पाणी आणून, फकिऱ्याला समजावून सांगतेफेका " . ."न वं तुमची ती जादु पण फकिऱ्या काही एक ऐकत नाही . .या विधानावरून कौतीकीचा समजुतदारपणा लक्षात येतो संताप .वर चवताळून पडतेयावरून कौतीकी जरी फकिऱ्या पण आपल्या पतीला योग्य मार्गावर .व्यक्त करते नेण्यासाठी तिचा हा प्रयत्न असतो .

एकुणच एक आदर्श पत्नी, एक आदर्श आई म्हणुनही कौतीकी ही व्यक्तिरेखा वाचकांच्या पसंतीस उतरताना दिसतेदेवकीला दिवस गेले असे कळताच . व तिची योग्य ती काळजी .कौतीकी देवकीला माहेरी आणते मांग यांच्या करणीचे परिणाम मात्र कौतीफकिऱ्या .घेतेकी व देवकीला भोगावे लागतातपाटलाच मोठ पोरग . .व देवकीला गप्प राहण्यास सांगतो .देवकीची अब्रू लुटतो आपल्यावर अन्याय होवूनही देवकी गप्प राहते हा प्रसंग .चित्रपटासारखा काल्पनिक वाटायला लागतो

तर बबन्या घरात येऊन फकिऱ्याला मारहाण करतोतेव्हा कौतीकी ., देवकी जखमी होताातव देवकीच . आपल्या मुलीवर व घरादारावर झालेल्या .लेकरू पडते अन्याय, अत्याचारावर न्याय मिळेल या आशेने कौतीकी पाटलाकडे जातेव .तेव्हा पाटील कौतीकीला उलट बोलतो . .जाण्यास सांगतो"त्या बबन्यांन केलं ते ठिक केलं. तुमच्या कर्माचं फळ तुम्हाला मिळालं." यावरून पाटलाचा धुर्तपणा, कपटीवृत्ती, सत्तेचा माज, जातीयवाद, गलिच्छ सुडाचे राजकारण दिसून येतेपाटलाचे उलट बोल ऐकून कौतीकी . .डाळजच्या वट्यावरून खाली पडते व आपला प्राण सोडते

एकुणच एक आदर्श आई, आदर्श पत्नी, कष्टकरी स्त्री,संसारिक स्त्री व संघर्षशील स्त्री म्हणून 'करणी' या कथेत कौतीकीची स्त्री व्यक्तीरेखा लक्ष्यवेधी ठरते.

वरील व्यक्तीरेखाच्या व्यतिरिक्त 'ताडमं' या कथासंग्रहातील 'ताडमं' या कथेतील शंकर गवळयाची बायको या दुय्यम स्त्री व्यक्तीरेखा आढळून येतात .'मेदड' या कथेतील परश्या, भाग्या,कान्यांची वानेरखेडची चुलत मावशी, तर 'माय' या कथेत गनेशाची बहीण, तर 'तळ' या कथेत गंगा तर 'जागल' या कथेत जेबल्याचे माय तर 'काटा' या कथेत पारी तर 'गोट्याच्या चुली' या कथेत मरीबाची बायको दासी, तर 'मी मेलोच नायी' या कथेत सनवाऱ्याची बायको, राझी, 'करणी' या कथेत कौतीकीची मुलगी देवकी, स्त्री व्यक्तीरेखा दिसून येतात व या स्त्री व्यक्तीरेखा .'ताडमं' या कथासंग्रहात लक्ष्यवेधी ठरतात.

**समारोप -:**

माधव सरकुंडे यांनी 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये वरील विविध प्रकारच्या स्त्री व्यक्तीरेखा चित्रित करून आदिवासी माणसाचे वास्तव व स्वाभाविक स्त्री व्यक्तीरेखाचे दर्शन वाचकांना घडविलेले आहेतसेच . काही स्त्री व्यक्तीरेखा या घटना प्रसंगानुरूप रेखांकित .केलेल्या दिसून येतात

माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहातील स्त्री व्यक्तीरेखा या ग्रामीण आदिवासी जीवनाशी संबंधित आहेतत्याची भाषा ., व्यवहार व संस्कृती ही ग्रामीण आदिवासी संस्कृतीशी नाळ जोडणारी व समृध्द ग्रामीण आदिवासी जीवनानुभव घडविणारी आहे .

माधव सरकुंडे यांच्या कथात्म वाङ्मयातील सर्व स्त्री व्यक्तीरेखा ह्या ग्रामीण आदिवासी जीवनानुभवातीलच आहेत. म्हणजे माधव सरकुंडे यांच्या वाङ्मय लेखनाची प्रेरणासुध्दा ग्रामीण आदिवासी माणुस आहेआणि तिच . माणसे माधव सरकुंडे यांच्या कथेमध्ये स्त्री व्यक्तीरेखा म्हणून आलेल्या दिसून येतात .

म्हणजे, ह्या सर्व स्त्री व्यक्तीरेखा ग्रामीण आदिवासी माणसाच्या प्रासंगिक रूपाने माधव सरकुंडे यांनी आपल्या कथात्मक साहित्यात चित्रित केल्या आहेत .'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहातील स्त्री व्यक्तीरेखा ह्या मानवीय गुण दोषासह दिसून येतात.

**संदर्भग्रंथ सूची.**

(१.( माधव सरकुंडे, सर्वा, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १४ एप्रिल २०००

(२माधव सरकुंडे.(, ताडमं, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१